
# व्यापारी नौसेना : नव्या व्यवसाय क्षेत्राची ओळख

**भारताला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. विविध कामांसाठी व्यापारी नौदल कार्यरत असते. या नौसेनेचा जगात १७ वा क्रमांक असून, ५०० जहाजे आहेत. खासगी व सरकारी मालकीच्या एकूण १४५ जहाज कंपन्या व्यवसाय करीत असून, त्यावर प्रशिक्षित कामगार पुरविण्यासाठी जवळजवळ २५० प्रशिक्षण संस्था सर्व भारतभर विखुरल्या आहेत.**

**महेश नरके**



**व्यापारी नौदलात करिअरच्या विविध संधी आहेत.**

भारताच्या विस्तीर्ण अशा समुद्र किनाऱ्यावर भारतीय व्यापारी नौसेना कार्यरत आहे. या नौसेनेचा जगातील १७ वा क्रमांक असून, त्यात जवळजवळ ५०० जहाजे आहेत खासगी व सरकारी मालकीची. त्यात प्रमुख शासकीय शिपिंग कॉर्पोरेशन आहे. मर्चंट शिपिंग ॲक्टअंतर्गत नॅशनल शिपिंग बोर्ड याची स्थापना शासनास सल्ला देण्यासाठी केली आहे. शासनाने घेतलेल्या योजनांची/ निर्णयांची अंमलबजावणी 'डिरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंग' करते. भारतीय व्यापारी नौसेनेत १६८ लाईट हाऊसेस, १ लाईटशिप, १२ लाईट बॉईज, २० रेडिओ बेकन्स, ४ डेका नेविगेटिंग चेन स्टेशन्स, ६ 'सी' चेन स्टेशन्स, २३३ बेकन्स, लाईट हाऊस डिपार्टमेंट, रेडिओ टेलिफोन सेट्स, लाँचेस, मेकनाईज्ड बोट, फॉग सिग्नल्स, लाईट हाऊस टेंडर्स, मोटर लाँचेस यांचा समावेश आहे.

जहाजबांधणीसाठी ४ मोठे व ३२ लहान/मध्यम आकाराचे शिपयार्डस आहेत. जहाजबांधणी आराखडा करण्यासाठी नॅशनल शिप डिझाईन व रिसर्च सेंटर आहे. १७ ड्रायडॉक्समध्ये जहाजदुरुस्ती केली जाते. भारत अंतर्गत जहाज वाहतुकीसाठी इन्लँड वॉटरवेजबरोबरच आणखी १० छोटी प्रतिष्ठाने आहेत. व्यापारी नौसेना आपला कारभार करण्यासाठी लहान-मोठ्या बंदरांचा उपयोग करते. त्यासाठी लाईनर/ पॅसेंजर/ बल्क कॅरियर्स/ टँकर्स/ लँडिंग क्राफ्ट युटिलिटी/सर्व्हे क्राफ्ट्स/ सीवर्ड डिफेन्स बोट्स/ फेरी क्राफ्ट्स/ टॉर्पेडो/ रिकव्हरी/ फिशिंग/ ऑफशोअर प्लॅटफॉर्म/ मल्टीपर्पज कॅरियर/ कंटेशरशिप/ स्पोर्टस- कम- स्टँडबाय कॅरियर/ जनरल कार्गो/ हेवी लिफ्टशिप/ एलएसजी/ एलपीजी/ कॅटलशिप/ केमिकल प्रॉडक्ट शिप्स अशा जहाजांचा उपयोग केला जातो. खासगी व सरकारी मालकीच्या एकूण १४५ जहाज कंपन्या व्यवसाय करीत असून, त्यावर प्रशिक्षित कामगार पुरविण्यासाठी जवळजवळ २५० प्रशिक्षण संस्था सर्व भारतभर विखुरल्या आहेत.

व्यापारी नौसेनेत जी जहाजे काम करतात, त्यातील कामगार वर्ग तीन विभागांत वाटला गेला आहे. ते येणेप्रमाणे :

१) **डेक डिपार्टमेंट** : डेक म्हणजे जहाजाचा वरील भाग. त्यात मास्टर/ चीफमेट/ कॅप्टन/ स्किपर/ पायलट, फर्स्ट मेट, सेकंड मेट, थर्ड मेट, हार्बर मास्टर, सारंग इत्यादी कर्मचारी जहाज हाकारण्याचे काम करतात.

२) **इंजिन रूम डिपार्टमेंट** : शिप इंजिनिअर, सेकंड/ थर्ड/ फोर्थ/ फिफ्थ इंजिनिअर व इतर कर्मचारी भल्यामोठ्या जहाज इंजिनाची देखभाल करून ते कार्यक्षम ठेवतात.

३) **रेटिंग्ज डिपार्टमेंट** : यातील कर्मचारी डेक/ इंजिन रूम विभागात काम करणाऱ्यांना सेवा प्रदान करतात. या रेटिंग्जचे तीन प्रकार खालीलप्रमाणे होत :

१) **डेक रेटिंग्ज** : यांना सीमेन म्हणून संबोधले जाते. जहाजाची उत्तम निगा राखण्याचे यांचे काम असते. जसे रंगरोगण, वंगण, दुरुस्ती इत्यादी.

२) **इंजिन रेटिंग्ज** : जहाज इंजिनाची निगा यांना राखावी लागते.

३) **कॅटरिंग/ सलून रेटिंग्ज** : यांचे प्रमुख काम म्हणजे खानपान, निवास, कपडालत्ता, सामग्रीगृह यांची व्यवस्था करणे.

**पान २ वर ▶**

दै. सकाळ - Edumantra - २४ फेब्रुवारी २०१०

सकाळ : पुणे
बुधवार, २४ फेब्रुवारी २०१०

# व्यापारी नौसेना : नव्या व्यवसाय क्षेत्राची ओळख

▶ पान १ वरून

याशिवाय इतर कर्मचारी म्हणजे नॉटिकल सर्व्हेअर्स, लाईट कीपर्स, स्कीन/ ड्रेस डाईव्हर्स, चार्टरिंग ऑफिसर, कंट्रोलर, को-ऑर्डिनेटिंग ऑफिसर, एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, रिसर्च ऑफिसर, टेक्निकल ऑफिसर, सुपरवायझर, लॉंच मेकॅनिक, फेरी सुपरिंटेंडेंट, फेरी इन्स्पेक्टर, बोसन, स्ट्युअर्ड, टोपास, डायरेक्टर ही पदे असतात व त्यात बढती पदे अनुभव व अंतर्गत प्रशिक्षणानंतर मिळतात. बढती पदे मिळविण्यासाठी या सर्व कर्मचाऱ्यांना मिनिस्ट्री ऑफ ट्रान्स्पोर्ट संचलित प्रोफिशन्सी उत्तीर्ण व्हावे लागते, तसेच विदेशी जहाजावर काम करण्यास पात्र असल्याचे प्रमाणपत्रही दिले जाते.

जहाजावर काम करणाऱ्यांना दीर्घ काळपर्यंत आव्हानात्मक व खडतर काम करावे लागते. प्रतिकूल वारे, वादळे, समुद्राचे रौद्र रूप, लाटा यांना सामोरे जावे लागते. आप्त-स्वकियांपासून बराच काळ दूर राहावे लागते. यासाठी प्रवास करण्याची आवड, घराची ओढ नसवी, खडतर कष्ट करण्यास तत्पर असावयास हवे. पण त्या मोबदल्यात उत्तम वेतन व भरपूर भत्तेही मिळतात. जोपर्यंत जहाजावर कार्यरत आहे तोपर्यंत खानपान, निवास, खेळ इत्यादी सोयी विनामूल्य मिळतात. वेतन खात्यावर जमा केले जाते. भारताच्या किनाऱ्यास लागल्यावर अनेक दिवसांची भरपगारी रजा मिळते. प्रशिक्षण काळ.कमीत कमी साडेचार महिन्यांचा, कमीत कमी पात्रता दहावी असल्यास या व्यवसायाची दारे उघडी होतात. हिंमत व जिद्द असल्यास हे दूरस्थ क्षितिजावर दिसणारे व्यवसाय जवळचे व जीवन समृद्ध करण्यास हातभार लावतात. करा तयारी. यश दूर नाही.

आयडीएस-३ चे रूपांतर आयडीएस-१ (कमर्शियल डाईव्हिंग कन्व्हर्शन कोर्स) होते. कालावधी ५ आठवडे. प्रशिक्षण खर्च रुपये ३९,०६० + भोजन व निवास खर्च. राहण्याची व्यवस्था डाईव्हिंग स्कूलतर्फे नेव्हल बेसबाहेर संस्थेतर्फे केली जाते व त्याचा खर्च १३०० रुपये प्र. मा. उमेदवारास करावा लागतो.

या अभ्यासक्रमाची रूपरेषा युनायटेड किंगडमच्या हेल्थ व सेफ्टी एक्झिक्युटिव्ह भाग-१ वर आधारित असून, त्यास इंटरनॅशनल मरीन कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, इंटरनॅशनल कन्सल्टन्सीची मान्यता आहे.

नोकरी करावयाची नसल्यास हे पाणबुडे स्वतंत्रपणे व्यवसाय करू शकतात. काही वर्षांपूर्वी इंडियन एक्स्प्रेसच्या सिटीझन या साप्ताहिकात एका प्रशिक्षित २१ वर्षीय तरुणांची मुलाखत वाचनात आल्याचे स्मरते. विचारल्यावरून त्याने सांगितले, की तो दिवसाकाठी ५०० ते ४००० रुपयांपर्यंत कमवू शकतो. या प्रशिक्षित बाणबुड्यांची भरती खालील शिपयार्ड/ डॉकयार्डमध्ये केली जाते :

हिंदुस्तान शिपयार्ड (मुंबई), माझगाव डॉक (मुंबई), बॉंबे पोर्ट ट्रस्ट (मुंबई), पटेल इंजिनिअरिंग वर्क्स (मुंबई), चेन्नई पोर्ट ट्रस्ट (चेन्नई), गोवा शिपयार्ड (गोवा), विशाखापट्टण शिपयार्ड ( विशाखापट्टण). सरकारी नियमाप्रमाणे वेतन व भत्ते मिळतात. शिपिंग कंपन्यांमध्येही अवसर आहेत.

समुद्रास रत्नाकर म्हणून ओळखले जाते. हे पाणबुडे स्वतंत्र व्यवसाय म्हणून समुद्रातून किमती वस्तू गोळा करून त्यांची विक्री सराफ बाजारामध्ये करतात. शंख, शिंपले, मोती, रत्ने किंवा अशाच प्रकारच्या वस्तू समुद्रतळाशी सापडतात.

**२) पाणबुडे : एक अनोखा रोजगार**

डाईव्हर (पाणबुडे) यांचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत :

**१) स्कीन डाईव्हर :** स्क्युबा (सेल्फ कंटेन्ड अंडरवॉटर ब्रीदिंग ॲपरटस) पोशाख चढवून समुद्रात उभ्या असलेल्या जहाजाच्या पाण्याखालील भागांचे निरीक्षण करून कोठे बिघाड आहे का याची माहिती वरिष्ठांना देणे हे यांचे काम आहे.

**२) ड्रेस डाईव्हर :** वरील प्रकारचाच पोशाख घालून जहाजाच्या पाण्याखालील भागांची दुरुस्ती करणे किंवा नवीन भाग घालणे हे यांचे काम आहे.

**प्रशिक्षण :** भारतीय नेव्हलशिप (आयएनएस) वेंदुरुभी, नेव्हल बेस, कोची ६८४ ००४ स्कूल ऑफ डाईव्हिंग येथे डाईव्हिंगचे प्रशिक्षण दिले जाते.

**पात्रता** - १० वी ५० टक्के, वय १८-२८. वैद्यकीयदृष्ट्या निरोगी व शारीरिक परिमाणे पूर्ण करावयास हवीत. प्रवेश कल चाचणी (ॲप्टिट्यूड टेस्ट) द्वारे दिला जातो. प्रशिक्षण कालावधी ११ आठवड्यांचा असून, २० उमेदवारांना प्रवेश दिला जातो.

**प्रशिक्षण सार :** आयडीएस-३ (इंडियन डाईव्हिंग स्टॅंडर्ड) हवाई सूर सामग्रीसह मारून सागरात ५५ मीटर खोलीपर्यंत करण्यास हे पाणबुडे पात्र आहेत. एकूण खर्च ९०,२०० रुपये शिवाय भोजन व निवास खर्च उमेदवारांनाच करावा लागतो.

**ज्यांना परदेशी प्रशिक्षण घ्यावयाचे आहे त्यांच्यासाठी खालील प्रशिक्षण संस्था आहेत :**

१) अंडरवॉटर ट्रेनिंग सेंटर, फोर्ट विल्यम्स, इन्व्हर्नेसशायर, स्कॉटलंड, एव्हझेड, ३३४, यु.के.

२) अंडरवॉटर ट्रेनिंग सेंटर, ऑस्ट्रेलियन नॅशनल अंडरवॉटर ट्रेनिंग सेंटर, इन्स्पेक्शन हेड व्हार्फ, पीओबी ब्युटी पॉईंट, ७२७०, ऑस्ट्रेलिया.

३) फोर्ट बॉबीसेंड, अंडरवॉटर सेंटर, फ्लायमाऊथ, ओशन प्रोजेक्ट लि., डेव्हन पीएव्ह, ९० एबी, यु.के.

४) इंटरडाईव्ह सर्व्हिस, इंटरडाईव्ह हाऊस, २२, लेपर्ड क्लोज, चेंबुरी, फ्लायमाऊथ, डेव्हन पीएल, ९० यु. के.

५) इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल द पोंगी, प्रोफेशनल एन्ट्री नं. ३, पोस्ट डेकसेंड, १३००८, मार्सिलिस, फ्रान्स.

६) प्रोडाईव्ह कमर्शियल डाईव्हिंग सेंटर, फॉलमंथ, डॉक्स, कॉर्नवॉल, टीआई, एनआय, यु. के.

अभ्यासक्रम कमर्शियल डाईव्हिंग + सॅच्युरेटेड डाईव्हिंग - पात्रता १२ वी (विज्ञानास पसंती). कालावधी - साडेचार महिने.

या अनोख्या व्यवसायात पदार्पण करण्यासाठी ज्यांच्याकडे जिद्द व साहस गुण आहेत त्यांनी जरूर प्रयत्न करावा व आपले जीवन समृद्ध करावे.